सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/ 2514-B
दिनांक :- 10 SEP 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक २/एनजीसी/Intake Approval/२०२५/५०९ दिनांक १७/०६/२०२५.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१४९४ दि. २६/५/२०२५.
३. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१७१४ दि. १९/६/२०२५.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८२१ दि. २७/०६/२०२५.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८५१ दि. ०१/०७/२०२५.
६. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/२०२५/१८६० दि. ०१/७/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तांत्रिक व्यावसायिक औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करण्यासाठी फार्मसी कौसिल ऑफ ईडिया, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यताप्राप्त संस्थांमधील पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत मंडळाचे किंवा विद्यापिठाची संलग्नता / समकक्षता प्रदान इत्यादी कागदपत्रे सादर करुन ऑनलाईन अद्ययावत करणेबाबत संदर्भीय पत्र क्र. १ ते ६ अन्वये आपणास वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

याबाबत आपणास कळविण्या येते की, ज्या संस्थांनी Intake Approval ची प्रक्रिया पुर्ण केलेली आहे अशा संस्थांनी आपल्या संस्थेचे लॉगिन करुन प्रवेश क्षमतेची माहिती शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधीत विद्यापिठाची सलग्नता / समकक्षता इत्यादी कागदपत्रावरुन पडताळणी करावे जर त्यामध्ये काही तफावत / त्रुटी आढळल्यास त्याबाबत या कार्यालयास **दिनांक ११/०९/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** कळविण्यात यावे. जर आपल्या संस्थेनी काहीही कळविले नाही तर संस्थेच्या प्राचार्यांनी सदर माहिती तपासली असून ती बरोबर आहे, असे गृहित धरुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील केन्द्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरीता अंतिम करण्यासाठी संचालनालयास सादर करण्यात येईल व तद्नंतर या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास त्याबाबत प्राचार्य व्यक्तीशः जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

(मनोज म. अंधारे)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.